वेलदोडा

प्रस्तावना

कोकणात जवळ-जवळ सर्व प्रकारची मसाल्याची पिके होतात. त्या पैकी वेलदोडा हे एक महत्वाचे पीक असून त्यास मसाला पिकांची राणी म्हणून संबोधण्यात येते. असे असले तरी वेलदोडयाच्या लागवडीपासून जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यासाठी त्याची शास्त्रोक्त व सुधारीत पद्धतीने लागवड करणे महत्वाचे आहे.

हवामान व जमीन

ज्या भागात किमान तपमान १० अंश सें. ग्रे. व कमाल तपमान ३५ अंश से.ग्रे. आहे अशा भागात वेलदोडा होऊ शकतो. तपमान १० अंश से.ग्रे. च्या खाली जात असेल त्याठिकाणी वेलदोडयाची वाढ खुंटते. सम प्रमाणात पडणारा पाऊस १५० ते ३०० सेमी. वेलदोडयास उपयुक्त आहे. कोकणपटटीत पावसाळयानंतर नियिमितपणे पाणी देणे आवश्यक आहे. समुद्रसपाटी पासुन ७५० मी. ते १५०० मी. उंचीपर्यंन्त वेलदोडयाची लागवड होऊ शकते. सर्वात अनुकूल उंची १३०० सेमी. समुद्रसपाटीपासून कोकणात विशेषतः सिंधुदूर्ग जिल्ह्यात सांवतवाडी तालुक्यातील आरोस या गावी अगदी समुद्रसपाटी वर नारळ- सुपारीच्या बागेत श्री. रघुनाथ विठठल नाईक या शेतक-याने वेलचीची लागवड फायदेशीरपणे करुन दाखविली आहे. या झाडास उष्ण हवामान व जोरदार वारा सहन होत नाही. उष्ण हवामानामुळे झाडे करपतात व वा-यामुळे झाडे मोडतात. त्यामुळे नारळ-सुपारीच्या नियमित पाणीपुरवठा असलेल्या जमिनीत ही झाडे चांगली येतात. तसेच या झाडांना सरळ सूर्यप्रकाश भरपूर प्रमाणात या झाडांना मिळणे आवश्यक आहे. यामुळे झाडांची सावली भरपुर पाणीपुरवठा व सकस जमीन विशेषतः कुजट जमिनीत हया झाडांची लागवड फायदेशीर होते. तसेच बागायतीच्या काही भागात असलेल्या दलदलीच्या जमिनीत भराव घालून उंचवटा तयार करुन त्यावर केलेली लागवडही यशस्वी होते. मात्र मुळाशी पाणी साचून राहिल्यास झाडास हानीकारक ठरते म्हणून रेताड जमिनीत शक्यतो लागवड करावी.

वेलदोडयाच्या प्रमुख जाती

- **म्हैसुर:-** या जातीचे झाडे समुद्रसपाटीपासुन १२०० मी. उंचीपर्यंन्त चांगले वाढतात वेलदोडयाच्या चार जाती मध्ये या जातीची झाडे फार जोमदार पणे वाढतात. झाडाची उंची ३ ते ४ मीटर पर्यंन्त होते. बोंड लांब असते सुरुवातीला गर्द हिरवा रंग असतो. ही जात कीड या रोगाला प्रतिकारक आहे.
- **मलबार:-** याची झाडे कमी जोमदार उंची ३ ते ३ मीटर पर्यंन्त बोंडाचा रंग फिक्का हिरवा असतो. ही जात कीड व रोगाला बळी पडते.
- **बझुका:-** ही जात म्हैसुर व मलबार या जातीपासून नैसर्गिकरीत्या संकराने तयार झालेली आहे. या जातीचे गुणधर्म म्हैसुर व मलबार या जातीच्या मधले आहेत. समुद्रसपाटीपासून ७५० ते १५०० मीटर उंचीपर्यंन्त ही झाडे उत्तमरीत्या येऊ शकतात. या जातीचे झाडे जोमदार असून कीड व रोग यांना प्रतिकारक आहेत.

अभिवृध्दी:- वेलदोडयाची अभिवृदी बिया लावुन सहजरित्या करता येते. चांगल्या जातीची निरोगी व भरघोस उत्पन्न देणा-या जातीच्या बियापासून रोपांची पैदास करावी.

साधारणतः ६०-७० ग्रॅम बी प्रती हेक्टरी पुरेसे आहे. ३x२ मीटर अंतरावर लागवड केल्यास ४००० बिया प्रती हेक्टरी ल्ागतात. निरोगी झाडांवरील मोठी, टपोरी, चांगली पिवळी झालेली फळे झाडावरुन काढून घ्यावीत. नंतर फळे फोडून आतील काळे बी अलग करावे. नंतर ते तीन ते चार वेळा थंड पाण्यात स्वच्छ धुवावे. जेवढया प्रमाणात बिया तेवढया प्रमाणात राखेत त्या मिसळून सावलीत दोन ते तीन दिवस वाळवावे.

त्यानंतर मध्यम सावलीच्या जागेत तीन फुट रुंदीचे ६ इंच उंच व योग्य त्या लांबीच्या गादी वाफयावर पाऊण इंच खोल रेघा ४ इंच अंतरावर काठीने संमातर पाडून त्यात विरळ प्रमाणात बी पेरावे त्या वर पातळ मातीच्या थराने बिया झाकून त्यावर विरळ गवताने आच्छादन द्यावे. एक दिवसाआड पाणी देण्यात यावे. साधारणपणे ४५ ते ६० दिवसांनी होणारी उगवण पुढील लागवडीस योग्य असते. बी साधारणपणे १ ते ५ महिन्या पर्यन्त उगवते. ऑक्टोबर-डिसेंबर मध्ये पेरणी करावी गादीवाफयावरील रोपे पावसाळयाच्या सुरवातीला हळुवारपणे उपटुन पॉलिथीन पिशवीत भरावेत. पॉलिथीन पिशवीत वाढलेल्या रोपांची केलेली लागवड १०० टक्के यशस्वी होते व कायम ठिकाणी रोपे लगेच जोमदार वाढू लागतात. पिशवीतील रोपे ८ महिन्यात कायम लागवडीसाठी योग्य होतात. तर निव्वळ गादी वाफयावरील रोपे १५ ते १८ महीने वयाची झाल्यावरच कायम लागवडीस योग्य असतात. रोपांची पैदास फक्त वाफयावरच करावयाची झाल्यास पावसाळयात दुस-या गादीवाफयावर विरळ लावावेत व पुढील पावसाळयात कायम ठिकाणी लागवडीसठी वापरावेत. रोपे लहान असताना त्यावर लीफस्पॉट हा रोग पडतो.व त्यावर १ टक्का बोडोमिश्रण फवारणे फार उपयुक्त ठरते.

पूर्वमशागत:- वेलदोडा हे सावली प्रिय झाड आहे. यासाठीच नारळाच्या व सुपारीच्या बागेतच वेलदोडयाचे पिक घेणे चांगले. सूर्यप्रकाश सरळ वेलदोडयावर पडणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सुपारीची लागवड ३x३ मीटरवर असल्यास दर दोन झाडांमध्ये एक वेलचीचे झाड लावता येईल. यापेक्षा सुपारीची दाट लावणी किंवा अन्य झाडे बागेत असल्यास मोकळया जागीच झाडे लावावीत.

रोपे ३x३, ३x३ किंवा २x२ मीटरवर सोयीनुसार लावावीत. वरील प्रमाणे योग्य अशी जागा निवडुन २ २ १ फुट मापाचे खडडे खोदावेत. चांगल्या मातीने व चांगले कुजलेल्या शेणखतात थोडी बी.एचसी पावडर २०० ग्रॅम सुपर फास्फेट व ५० ग्रॅम हाडाची पुड (स्टेरामिल) मिसळावी व भरुन काढावे.ज्या दिवशी रोप लावायाची असतील त्याच दिवशी वरील प्रमाणे खडडे खोदावेत.

रोपांची लागवड:- खतांच्या व मातीच्या मिश्रणाने खडडा जमिनीच्या पातळी पेक्षा ४ बोटे (अंदाजे ३ ते ४ इंच) उलटया बशीच्या आकाराच्या उंचवटा करुन घ्यावा. नंतर पिशवीच्या आकाराच्या पुन्हा उंचवटयावर खडडा घेऊन पिशवी ब्लेडने अलगद कापुन मातीचा गडडा न कोसळता अलगद खडयात लावावा. यासाठी रोपांना पाणी दिल्यानंतर लगेच त्यांची लागवड न करता काही तासानंतर म्हणजे पिशवीतील माती जास्त ओली नसताना लावावेत. रोप जास्त खोल लाऊ नये. मुळे झाकली जातील इतपतच खोल रोप लावावे. रोप खोल लावल्याने वाढ कमजोर तसेच प्रसंगी मरण्याची शक्यता असते. कायम जागी रोप लावण्यापुर्ची त्यांची किमान वाढ २.५ ते ३ फुट उंच व एका रोपाला १ ते २ फुटवे असावेत. कोकणात लागवड साधारणपणे ऑगस्ट-संप्टेबंर मध्ये पावसाचा जोर संपल्यावरच करावी. रोपांस जरुरीप्रमाणे काठीचा आधार द्यावा.

पाणी देणे:- पावसाळा संपल्यानंतर त्वरीत पाणी देण्याची व्यवस्था करावी. ही रोपे पाण्याचा ताण आजिबात सहन करु शकत नाहीत. त्यामुळे त्यांना जमिनीत नियमित ओलावा राहील याची काळजी घ्यावी. जमीन सकस असल्यास चार दिवसाने एकदा पाणी पुरसे आहे. पाणी देण्यासाठी रोपास आळे करु नये. मोकाट पाणी दिलेले चांगले.

खते:- सामान्यातः ही झाडे खादाड नाहीत. मूळ पिकास (बागेस) दिलेल्या खताच्या काही भागावर ही चांगली येतात पण ब-याच ठिकाणी माड, सुपारी बागेस पुरेसे खत दिले जात नाही. म्हणून चांगले उत्पन्न

येण्यासाठी रोपाच्या पसा-या सभोवती ४ इंचाचा गोल चर काढावा. त्यात रोपांच्या वाढीनुसार २५० ते ५०० ग्रॅम स्टेरामिल (नत्र, स्फुरद व पालाश ५:१०:१०) अधिक चांगले कुजलेले शेणखत व ५० ते १०० ग्रॅम सुफला (१५:१५:१५) ही खते एकत्र मिसळुन ऑगस्ट-संप्टेबर व मे-जून मध्ये दोनवेळा द्यावी. खते घातल्यावर चर मातीने बुजवून घ्यावा.

वेलदोडा केव्हा लागेल:- रोपांना वातावरण व जमीन मानवल्यास रोपे एका वर्षातच ४ ते ५ फुट उंचा व १० ते १५ रोंपाचे बेट तयार होते. व तिस-या ते चौथ्या वर्षी डिसेबंर-जानेवारीत मुळ रोपास जमिनी लगत हिरवट रंगाचे वेल येण्यास सुरुवात होत. वेलाची वाढ होत जाते व जास्तीत जास्त ३ फुटापर्यंन्त वाढ होते. वेल वाढत असतानाच मागील पापुद्रयातुन नाजुक कळया व नंतर एकच यथावकाश फुलांना हिरवट रंगाची छोटी-छोटी फळे धरु लागतात. फलधारणा चांगली झाल्यास फळे वेलावंर गुच्छाच्या स्वरुपातही होऊ शकतात. सर्वसाधारणपणे फळधारणे नंतर ३ ते ४ महिन्यात फळे काढणीस तयार होतात. मात्र सर्व फळे एकाच वेळी तयार होत नाहीत.

वेलदोडा काढणी व प्रक्रिया:- फळे काढणीस तयार झाल्यावर त्यांचा हिरवा रंग जाऊन पिवळया रंगाची होते. अशी फळे अलगद छोटयाशा कात्रीने देठासह कापून गोळा करावीत. ५ ते ६ दिवस फळे चांगली वाळविणे आवश्यक आहे. बदलत्या हवामानानुसार क्वचित प्रसंगी फळे पावसाळयात तयार होतात. अशावेळी सूर्यप्रकाश नसल्यामुळे कोळशाची शेगडी पेटवुन त्याच्या दीड फुट उंचीवर तारेची जाळी पासरुन त्यावर फळे वाळवावी. फळे चांगली वाळविताना धुर होऊ देऊ नये. वाळविताना फळे अधुन-मधून हलवावीत. योग्य काळजी व उष्णता दिल्यास फळे थोडीशी काळसर रंगाची व चमक नसलेली दिसतात. मात्र सुवासास ती मुळीच कमी नसतात. पुर्ण वाढलेली फळे नंतर छोटया कात्रीने जास्त असलेली देठाचा भाग व फुलांचा अवशेष कापून नीट करावी. तडकलेली व खराब फळे वेचुन वेगळी काढावीत. व ती आपल्या घरगुती वापरासाठी ठेवावीत. चांगली फळे घटट झाकणा-या, चांगल्या पत्र्याच्या डब्यात साठवुन ठेवावीत व योग्य वेळी बाजारात विक्री करावी. अगदी नवीन फळापेक्षा एक दोन महिने अगोदर वाळवून साठवून ठेवलेली फळे जास्त सुवासिक असतात. आज बाजारात मिळणा-या वेलीस खास भटटीत वाळवुन चकाकी दिलेली असते. त्यामुळे ती टपोरी व चमकदार दिसते. कोकणातील अत्यल्प लागवडीमुळे वरील पद्धतीने फळे वाळविणे शक्य नाही . ह्यामुळे चांगला मोठया वाढलेल्या एका वेलापासून वर्षभरात २०० ग्रॅम, वाढलेली फळे मिळू शकतात व त्याची आजच्या बाजारभावाने किमान ६०ते८० रुपये मिळतात. साधारपणे ७५ टक्के फळे डिसेंबर व उरलेली २५ टक्के फळे इतर महिन्यात मिळतात.

रोग व किडी:- या रोपावर मुख्यतः बुरशीजनक रोगाचा उपद्रव होतो. कारण फळे व वेली जमिनीवरच लोळत असतात. रोगाच्या उपद्रव दिसून येताच फळे व वेल कुजलेले दिसतात. अशावेळी पाण्याच्या चांगला निचारा होण्यासाठी व्यवस्था करावी व १ टक्का तीव्रतेचे बोडोमिश्रण किंवा २ ब्लॉयटॉक्सचे मिश्रण फवारावे . शक्यतो रोग होण्यापुर्वीच औषधाची फवारणी करावी.

तसेच ज्या बागेत केळीची लागवड आहे त्या ठिकाणी खवले किडीचा (ऍफिडस) उपद्रव होण्याची शक्यता असते. म्हणून केळीची लागवड करु नये. ही कीड मुख्यतः रस शोषण करणारी असल्यामुळे उपद्रव झाल्यास फळे कमी प्रमाणात येतात. या किडीवर नुव्हॉक्रॉन ०.०२ टक्के, डिमेक्रॉन ०.०३ टक्के रोगार ०.०३ टक्के केडाल ०.०३ टक्के यांचा अधुनमधून फवारा मारावा. सर्वसाधारणपणे ब्लॉयटॉक्स गंधक, डायथेन-एम ४५. केडाल, डिमेक्रॉन किंवा रोगावर यापैकी एखादया औषधाची फवारणी करावी.